नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १३६ Issue - 136 | वार शनिवार दि. ४ ऑक्टोबर २०२५ Blow- Saturday Date 4 October 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com



## राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या नगराध्यक्ष पदाच्या आरक्षणाची सोडत सोमवारी

### येत्या सोमवारी मंत्रालयातून मोठी घोषणा होणार; राज्यभरात नऊ कोटी ८० लाख मतदार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या नगराध्यक्ष पदाच्या आरक्षणाची सोडत येत्या सोमवारी ६ ऑक्टोबरला मुंबईत काढली जाणार आहे. राज्याच्या नगर विकास विभागाने सर्व राजकीय पक्षांना पत्र पाठवून या सोडतीची माहिती नगर विकास विभागाच्या शासनाच्या उप सचिव प्रियांका कुलकर्णी-छापवाले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. मार्च २०२२ पासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासक राज आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जानेवारी अखेर घेतल्या जाणार आहेत. राज्य निवडणूक आयोगाने तसे नियोजन केले आहे.

नगर विकास विभागाच्या उपसचिव प्रियंका कुलकर्णी यांनी काढलेल्या पत्रानुसार, राज्यातील २४७ नगरपरिषदा आणि १४७ नगरपंचायतींच्या नगराध्यक्ष पदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी ही सोडत प्रक्रिया राबवली जाणार आहे. ही सोडत मुंबईतील मंत्रालय येथील सहाव्या मजल्यावरील परिषद सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. दोन टप्प्यात होणाऱ्या निवडणुकांमध्ये पहिला टप्पा जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या किंवा नगरपालिका-नगरपरिषदांचा असणार आहे. दिवाळीत या निवडणुकांचा बिगुल वाजेल, अशी माहिती निवडणूक आयोगातील विश्वनिय सूत्रांनी दिली. विधानसभा निवडणुकीनंतर आता राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकण्यासाठी प्रत्येक पक्ष आपापल्या परीने प्रयत्न करीत आहेत. सध्या नगरपालिका नगरपरिषदांच्या मतदार याद्यांचा कार्यक्रम जाहीर झाला. त्यानंतर आरक्षण काढले जाईल. दरम्यान, जिल्हा परिषदांच्या आरक्षणाचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यामुळे या स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक पहिल्या टप्प्यात होणार आहे. नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायतींच्या नगराध्यक्षांची निवड जनतेतूनच होणार आहे. नगराध्यक्षांच्या आरक्षणाची सोडत सरकारच्या वतीने काढली जाणार आहे. राज्यात २०१९ नंतर सत्ता बदल झाल्यावर नगराध्यक्षांची निवड बहुमताने केली जात होती. आता त्यात पुन्हा बदल करण्यात आला असून स्थानिक स्वराज्य संस्थांचे नगराध्यक्ष जनतेतूनच निवडले जातील, हे निश्चित झाले आहे.

मंत्रालयातील सुरक्षा व्यवस्थेच्या कारणास्तव प्रत्येक राजकीय पक्षाला दोन प्रतिनिधींना या सोडतीसाठी पाठवण्याची विनंती शासनाने केली आहे. या सोडतीमध्ये फलटण नगरपरिषदेचे नगराध्यक्ष पद कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षित होणार, हे निश्चित होणार असल्याने तालुक्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष या सोडतीकडे लागले आहे. दरम्यान, महापालिकांच्या वॉर्डरचनेचा विषय अजूनही प्रलंबितच असल्याने या निवडणुका डिसेंबर-जानेवारीत होतील, असे नियोजन आहे.

दिवाळीत पहिल्या टप्प्यातील निवडणुकांचा बिगुल वाजणार आहे. निवडणुकीसाठी उपलब्ध मनुष्यबळ, ईव्हीएम या बाबींचा अंदाज घेऊन निवडणुकींचा कार्यक्रम तयार केला जाईल, असेही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्यभरात नऊ कोटी ८० लाख मतदार आहेत. या निवडणुकांच्या निकालावरून राज्यातील राजकीय पक्षांचे भविष्य ठरणार आहे. त्यामुळे या निवडणुका जिंकण्यासाठी सर्व पक्षांनी कंबर कसली आहे. मंत्रालय आणि परिसर सुरक्षिततेच्या कारणास्तव मंत्रालयीन प्रवेशाची स्थिती विचारात घेऊन, सदर आरक्षणाच्या सोडतीसाठी विविध पक्षांचे दोन प्रतिनिधी यांना आमंत्रित करण्यात येत असून, पक्षाच्या अध्यक्ष/सचिव यांनी दोन प्रतिनिधी यांची शिफारस करुन आरक्षणाच्या सोडतीसाठी पाठविण्यात यावे असे आवाहन देखील नगर विकास विभागाच्या शासनाच्या उप सचिव प्रियांका कुलकर्णी-छापवाले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था अशा :**
- जिल्हा परिषदा – ३२
- पंचायत समित्या – ३३१
- महापालिका – २९
- नगरपालिका आणि नगरपरिषदा – २८९

## लहान मुलांसाठी कफ सिरपच्या वापरासंबंधी केंद्र सरकारची नवी मार्गदर्शक तत्त्वे जारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : लहान मुलांच्या आरोग्य सुरक्षिततेसाठी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी कफ सिरप आणि सर्दीवरील औषधांच्या वापराबाबत महत्त्वपूर्ण नवी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. या सूचनांनुसार, बालरोग तज्ज्ञ आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना लहान मुलांना ही औषधे देताना विशेष काळजी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, दोन वर्षांखालील मुलांना कफ आणि सर्दीवरील कोणतीही औषधे देऊ नयेत. तसेच, पाच वर्षांखालील मुलांसाठी ही औषधे सामान्यतः शिफारस केलेली नाहीत. कारण, लहान मुलांमधील तीव्र कफ आणि सर्दीचे बहुतांश आजार स्वतः हून बरे होतात आणि त्यासाठी औषधांची गरज पडत नाही.

कफ आणि सर्दीवर प्राथमिक उपचार म्हणून नैसर्गिक उपायांना प्राधान्य देण्याचा सल्ला देण्यात आला आहे. यामध्ये पुरेसे पाणी पिणे, विश्रांती घेणे आणि आधार देणारे उपाय यांचा समावेश आहे. औषधोपचार आवश्यक असल्यास, डॉक्टरांनी रुग्णाची काळजीपूर्वक तपासणी करून आणि जवळच्या देखरेखीखाली औषधे द्यावीत. डॉक्टरांनी सांगितलेल्या डोस आणि उपचाराच्या कालावधीचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे. एकाच वेळी अनेक औषधे मिसळून देणे टाळावे, असेही निर्देश आहेत.

सर्व आरोग्य केंद्रे आणि दवाखान्यांनी केवळ उत्तम उत्पादन मानकांनुसार (ऋच्झ) तयार केलेली आणि उच्च औषधी दर्जाची कफ सिरप खरेदी करावीत, असे मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नमूद आहे. यामुळे औषधांची सुरक्षितता आणि परिणामकारकता सुनिश्चित होईल.

या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी सर्व दवाखाने, जिल्हा आरोग्य विभाग, औषध वितरण केंद्रे, प्राथमिक आणि सामुदायिक आरोग्य केंद्रे, जिल्हा रुग्णालये तसेच वैद्यकीय शिक्षण संस्थांमध्ये तातडीने करावी, असे निर्देश सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना देण्यात आले आहेत.

## देशात ५७ नवी केंद्रीय विद्यालये, मंत्रिमंडळ समितीची मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशभरात ५७ नवीन केंद्रीय विद्यालये मंत्रिमंडळाच्या व्यवहारविषयक सुरू करण्यास आर्थिक समितीच्या (सीसीईए) बैठकीत बुधवारी मान्यता देण्यात आली. यापैकी ७ गृहमंत्रालयाच्या अंतर्गत येतील, तर ५० विद्यालयांचे व्यवस्थापन राज्य सरकारांकडे असेल. नव्याने उघडल्या जाणाऱ्यापैकी २० शाळा अशा जिल्ह्यांमध्ये उघडल्या जातील जिथे केंद्रीय विद्यालये नाहीत, परंतु केंद्र सरकारचे कर्मचारी लक्षणीय संख्येने आहेत. या प्रकल्पासाठी पुढील नऊ वर्षांत ५,८६२ कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च येईल. यामुळे आधीच मंजूर झालेल्या ८५ केंद्रीय विद्यालयांव्यतिरिक्त, देशभरात




एकूण १४२ केंद्रीय विद्यालये कार्यरत होतील.

या योजनेत अंदाजे २,५८५.५२ कोटी रुपयांचा भांडवली खर्च आणि ३,२७७.०३ कोटींचा शाळा व्यवस्थापनाचा खर्च समाविष्ट आहे. कोणत्या जिल्ह्यांत नव्याने केंद्रीय विद्यालये सुरू होतील याचा तपशील सरकारने सध्या दिलेला नसला तरी यातील १४ शाळा आकांक्षी जिल्ह्यांमध्ये, ४ नक्षलग्रस्त जिल्ह्यांमध्ये आणि ५ ईशान्य व पर्वतीय राज्यांत प्रस्तावित आहेत.

तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या मंत्रिमंडळाने १९६२-६३ मध्ये देशभरातील केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांच्या मुलांना एकसमान शिक्षण देण्यासाठी केंद्रीय विद्यालयांची स्थापना केली होती. या उपक्रमांतर्गत, शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत 'केंद्रीय शाळा संघटना' ची स्थापना करण्यात आली. सध्या, भारत आणि परदेशात एकूण १,२८८ केंद्रीय विद्यालये कार्यरत आहेत, ज्यात परदेशातील तीन (मॉस्को, काठमांडू आणि तेहरान) शाळा समाविष्ट आहेत. यंदा ३० जूनपर्यंतच्या आकडेवारीनुसार या केंद्रीय शाळांमध्ये सध्या सुमारे १३.६२ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

या विस्तारामुळे केंद्रीय विद्यालयांची मागणी पूर्ण होण्यास मदत होईल. प्रत्येक केंद्रीय विद्यालयात अंदाजे १,५२० विद्यार्थ्यांसाठी सुविधा असतील, ज्याचा एकूण ८६,६४० विद्यार्थ्यांना फायदा होईल. पूर्ण क्षमतेच्या केंद्रीय विद्यालयात अंदाजे ८१ शिक्षक व कर्मचारी असतात असा नियम आहे. परिणामी, ५७ नवीन विद्यलयांमुळे किमान ४,६१७ कायमस्वरूपी नोकऱ्या निर्माण होतील व बांधकाम आणि संबंधित उपक्रमांमुळे अनेक कुशल आणि अकुशल कामगारांना रोजगार मिळेल असा सरकारचा दावा आहे.

## राज्यात दुग्धव्यवसाय विकासासाठी अभ्यास समिती गठीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात दूध व दुग्धजन्य पदार्थांची उत्पादकता वाढविणे आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक बळकटीकरणासाठी राज्यस्तरीय अभ्यास समिती गठीत करण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय विभागाने निर्गमित केला आहे. राज्यातील दूध उत्पादन कमी असलेल्या भागांमध्ये दूध उत्पादन वाढीसाठी दिर्घकालीन उपाययोजना सुचविणे हा या समितीचा उद्देश आहे. सहकारी व खासगी दूध संघाकडून आलेल्या सूचनांवर समिती उपाययोजना सुचविणार असल्याचे दुग्धविकास मंत्री अतुल सावे यांनी सांगितले.

दुग्धविकास मंत्री अतुल सावे म्हणाले, अभ्यास समितीचे अध्यक्ष पशुसंवर्धन आयुक्त, असून, सदस्य सचिव म्हणून दुग्धव्यवसाय विकास आयुक्त हे आहेत. समिती राज्यातील दुग्धव्यवसायाच्या परिस्थितीचा आढावा घेईल. समितीच्या कार्यात विकसित महाराष्ट्र २०४७ या उद्दिष्टांचा विचार केला जाईल.

### ऑपरेशन सिंदूरबाबत हवाई दल प्रमुख एपी सिंग यांचा दावा

### ऑपरेशन सिंदूर इतिहासात लक्षात राहील

## पहलगाम हल्ल्याची पाकिस्तानला मोठी किंमत मोजावी लागली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय हवाई दलाचे प्रमुख एपी सिंग यांनी पाकिस्तानचा पर्दाफाश केला आहे. भारतीय सैन्याने ४-५ पाकिस्तानी लढाऊ विमाने पाडली. या कारवाईदरम्यान पाकिस्तानला मोठी किंमत मोजावी लागली, असे हवाई दलाचे प्रमुख एपी सिंग म्हणाले. ते म्हणाले की, पहलगाम हल्ल्याची पाकिस्तानला मोठी किंमत मोजावी लागली. ऑपरेशन सिंदूर इतिहासात लक्षात राहील. आम्ही ३-४ दिवसांत युद्ध पूर्ण केले. जगाने भारताकडून युद्ध कसे संपवायचे ते शिकले पाहिजे. आम्ही पाकिस्तानी हद्दीत ३०० किलोमीटर आत मारा केला. आमची जमिनीवरून सोडलेली क्षेपणास्त्रे अत्यंत अचूक आणि अभेद्य होती. पाकिस्तानच्या नागरी लोकसंख्येला कोणतीही जीवितहानी झाली नाही. अमर प्रीत सिंग ऑपरेशन सिंदूर वर्षातील सर्वात महत्त्वाचा लष्करी सहभाग असल्याचे म्हटले आहे.

सर्वात लांब मारा त्यांच्या हद्दीत ३०० किमी पेक्षा जास्त होता

या ऑपरेशनने भारताच्या मजबूत हवाई संरक्षण क्षमता आणि संयुक्त सेवा नियोजनाचे प्रदर्शन केल्याचे ते म्हणाले. हिंडन एअर बेसवर ८ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या परेडपूर्वी वार्षिक एअर फोर्स डे पत्रकार परिषदेत बोलताना सिंग म्हणाले की, लांब पल्ल्याच्या जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे (एसएएम) निर्णायक घटक होती. आम्ही मिळवलेला सर्वात लांब मारा त्यांच्या हद्दीत ३०० किमी पेक्षा जास्त होता. आमच्या मजबूत हवाई संरक्षण पायाभूत सुविधांनी परिस्थिती बदलली, असे ते म्हणाले. हवाई दल प्रमुखांनी त्या रेंजवर कोणती पाकिस्तानी उपकरणे पाडण्यात आली



हे उघड केले नाही किंवा त्या मारामारीसाठी कोणती भारतीय एसएएम प्रणाली जबाबदार आहे याबद्दल त्यांनी तपशीलवार माहिती दिली नाही. परंतु ते भारताने रशियाकडून खरेदी केलेल्या आणि ३०० किलोमीटरपेक्षा जास्त पल्ला गाठणाऱ्या अत्यंत प्रगत एस-४०० क्षेपणास्त्र प्रणालीबद्दल बोलत असण्याची शक्यता आहे.

हवाई प्रमुख मार्शल एपी सिंग पुढे म्हणाले की, ही कारवाई त्याच्या अचूकतेसाठी आणि परिणामासाठी इतिहासात नोंदली जाईल. ऑपरेशन सिंदूरच्या फक्त एका रात्रीत आम्ही अचूकतेने हल्ला करू शकलो, कमीत कमी जीवितहानी साध्य करू शकलो आणि त्यांना गुडघे टेकवू शकलो, असे सिंग म्हणाले. १९७१ नंतर सार्वजनिकरित्या उघड होणारी ही पहिलीच विनाशकारी कारवाई असल्याचे त्यांनी म्हटले. आयएएफ प्रमुखांनी लष्कर, नौदल आणि हवाई दलाला संयुक्तपणे हल्ल्यांचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्याचे श्रेय दिले. ऑपरेशन सिंदूरमध्ये आम्ही अचुक, अभेद्य आणि प्रभावी असल्याचे सिद्ध केले, असे ते म्हणाले. सिंग यांनी ऑपरेशन दरम्यान चुकीच्या माहितीचा प्रतिकार करण्यात माध्यमांची भूमिका देखील अधोरेखित केली. खोट्या माहितीचा भरपूर वापर झाला होता, परंतु आमच्या माध्यमांनी सैन्याला खूप मदत केली. सैनिक लढत असताना सार्वजनिक मनोबलावर परिणाम होऊ नये आणि चॅनेल्सने याची खात्री केली, असे त्यांनी नमूद केले.

भविष्यातील युद्धे मागील युद्धांसारखी नसतील यावर भर देताना सिंग यांनी भर दिला. आपण आपले विचार चालू ठेवले पाहिजेत, वर्तमान आणि भविष्यातील युद्धांसाठी तयार राहिले पाहिजे आणि सर्व सेवा आणि एजन्सींसोबत एकात्मिक दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे, असे ते म्हणाले. त्यांनी पुढे सांगितले की, आत्मनिर्भरता (स्वावलंबन) हा भारतीय हवाई दलाच्या रोडमॅपमध्ये केंद्रस्थानी आहे. ङउ चज्ञ१ साठी ऑर्डर देण्यात आल्या आहेत, तर ङउ चज्ञ२ आणि भारतीय मल्टी-रोल हेलिकॉप्टर (खचठक) प्रकल्प पाइपलाइनमध्ये आहेत. विविध रडार, प्रणाली आणि स्वदेशी नवोपक्रम विकसित होत आहेत.

९३व्या हवाई दल दिनानिमित्त ८ ऑक्टोबर रोजी हिंडन हवाई दल तळावर परेड आयोजित केली जाईल आणि ६ ऑक्टोबर रोजी पूर्ण ड्रेस रिहर्सल होईल. परेडमध्ये हवाई दल प्रमुख, नौदल प्रमुख आणि लष्कर प्रमुख उपस्थित राहतील. ऑपरेशन सिंदूर ध्वज घेऊन जाणाऱ्या एमआय-१७ हेलिकॉप्टरद्वारे ध्वज फ्लायपास्ट करण्याचे नियोजन आहे. स्थिर प्रदर्शनांमध्ये राफेल आणि एसयू-३० एमकेआय लढाऊ विमाने, वाहतूक विमाने, आकाश जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्र प्रणाली, रडार आणि इतर शस्त्रे दाखवली जातील. सिंग म्हणाले की, या उत्सवात १८ स्टार्टअपवर प्रकाश टाकला जाईल, जे स्वावलंबन, समस्या सोडवणे आणि भविष्यवादी विचारसरणीवर भारतीय हवाई दलाचे लक्ष प्रतिबिंबित करतात. त्यांनी असेही नमूद केले की लढाऊ कारवायांव्यतिरिक्त, गेल्या वर्षी भारतीय हवाई दलाने आसाम, सिक्कीम, हिमाचल प्रदेश, पंजाब आणि इतर राज्यांमध्ये अनेक मानवतावादी मदत मोहिमा राबवल्या आहेत.

## संपादकीय....

### आरक्षण सोडत

राज्यातील जिल्हा परिषदांच्या अध्यक्ष पदाची आरक्षण जाहीर झाल्यानंतर आता नगरपरिषदांच्या नगराध्यक्ष पदांचे आरक्षण येत्या सोमवारी जाहीर होणार आहे. नगराध्यक्षपद आरक्षणाची सोडत सोमवारी मंत्रालयात काढली जाणार आहे. मान्यताप्राप्त राष्ट्रीय आणि राज्य पक्षांच्या प्रतिनिधींना सोडतीवेळी हजर राहण्यासाठी पत्र देण्यात आली आ-हेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दिवाळीनंतर घेण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. प्रशासकीय पातळीवर निवडणूक पूर्व प्रक्रिया पूर्ण केल्या जात आहेत. राज्यातील २४७ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सदस्यपदाच्या व थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठीची प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी ८ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यावर १३ ऑक्टोबर २०२५ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील. राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक निश्चित केला असून त्या दिवशी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी या निवडणुकांसाठी वापरण्यात येणार आहे. प्राभगनिहाय प्रारुप मतदार यादी ८ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध केली जाईल. त्यावर १३ ऑक्टोबर २०२५ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील. प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी २८ ऑक्टोबर २०२५ रोजी जाहीर केली जाईल. प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करताना विधानसभा मतदारसंघाच्या यादीप्रमाणेच मतदार याद्यांमध्ये मतदारांची नावे व पत्ते कायम ठेवले जातात. या याद्यांमध्ये नवीन नावांचा समावेश करणे, नावे वगळणे अथवा नावे किंवा पत्त्यांमध्ये दुरूस्ती करणे इत्यादी स्वरूपाची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. गुरुव-ारी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी आरक्षण जाहीर होण्याची तारीख निश्चित झाली आहे. यानुसार १३ ऑक्टोबरला आरक्षण सोडत असणार आहे. राज्यातील ३२ जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या ३३६ पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता सदस्यपदाचे आ-रक्षण निश्चित करण्यासाठी १३ ऑक्टोबर २०२५ रोजी आरक्षण सोडत काढण्यात येणार असल्याची घोषणा राज्य निवडणूक आयोगाने केली आहे. त्याचबरोबर नगरपरिषद, नगरपंचायतींची प्रारुप मतदार यादी ८ ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार आहे. संबंधित जिल्हाधिकारी १० ऑक्टोबर २०२५ रोजी वृत्तपत्रांत आरक्षण सोडतीसंदर्भातील सूचना प्रसिद्ध करतील. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सोडत काढल्यानंतर प्रारूप आरक्षणाची अधिसूचना प्रसिद्ध केली जाईल.

# सुरेश मूचंडे यांचे सामाजिक कार्य कौतुकास्पद : आ. सचिनदादा कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट : सख्या भावा भावात एक फुटाच्या जागा साठी मोठ मोठे भांडण तंटे नेहमी निर्माण होतात.परंतु करजगीचे सुरेश धरेप्पा मूचंडे आणि त्यांचे धर्मपत्नी अन–राधा सुरेश मूचंडे या दाम्पत्यानी शक्तिपीठ मल्लिनाथ देवस्थान साठी राष्ट्रीय संत श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज यांना ५ एकर जमीन म ोफत दान देऊन स्वखर्चाने मंदिरही बांधून दिले आहे. अशा या महान भूदान मूचंडे परिवाराचे कितीही कौतुक केले तरी कमी आहे, असे गौरव उदगार आ.सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी केले आहे.



तालुक्यातील करजगी हंद्राळ रस्त्यावरील श्री शक्ती पीठ मल्लिनाथ आश्रम – देवस्थान येथे गुरुवार २ ऑक्टोबर रोजी जय भारत माता सेवा समिति नवी दिल्ली राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष सद्गुरू श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज यांचे दिव्य सानिध्यात कळसारोहाण कार्यक्रम मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.या प्रसंगी आमदार सचिन कल्याणशेट्टी बोलत होते.यावेळी बोलताना म्हणाले की,सदगुरू हवा मल्लिनाथ महाराज यांच्या हस्ते करजगी व हंद्राळ येथे झालेला हे संपूर्ण देशाचे शक्तिपीठ असून सर्व धर्माचे श्रद्धास्थान आहे. यामुळे करजगी व हंद्राळ या पंचक्रोशीतल जनता फार भाग्यवान असल्याची आ.सचिन कल्याणशेट्टी यांनी सांगितलं. करजगीचे सरपंच विवेक उंबरजे, हंद्राळचे उद्योगपती तथा माजी सभापती मल्लिकार्जुन काटगाव,पंचायत समितीचे माजी सदस्य अण्णाराव याबाजी, शेगा–वचे हणमंत बाबुराव पाटील, अक्कलकोट समर्थ नगरीचे माजी सरपंच प्रदीप पाटील, किणीचे उप सरपंच अमोल हिप्परगी, कंटेहल्लीचे माजी सरपंच चंद्रकांत वाघे आदिजण प्रमुख उपस्थित होते.

गुरुवार दि.२ ऑक्टोबर रोजी पहाटे श्री चे महापूजा, नवग्रह पूजा करण्यात आले. सकाळी १० वाजता करजगी गावातून देवस्थान पर्यंत विविध वाद्य व सुहासिनीसह भव्य कळस मिरवणूक काढण्यात आले असून दिवसभर देशभक्ती सह भजन गायन कार्यक्रम करण्यात आले.यावेळी पांडुरंग हरी भजन संघ हंद्राळ चे श्रीमंत वाले, आणप्पा हालोळी,सरोजिनी तुप्पद,कलावती पाटील,

लक्ष्मी विजापुरी, सोलपूर येथील हतुरे वस्ती चे निर्मला बिराजदार,संगीता नारायणकर आदींनी देशभक्ती सह विविध धार्मिक भजन गायन गाईले.यावेळी या कार्यक्रम साठी करजगी, हंद्राळ, जेऊर, तडवळ,मंगरूळ या पंचक्रोशीतील भाविक भक्तांसह अक्कलकोट व इंडी तालुक्यातून भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराजांचा दर्शन व महाप्रस–ादाचा लाभ घेऊन भाविक भक्तांनी जल्लोष साजरा केला.

> सर्व धर्मांची समानता, निसर्गाचा नियम आणि संविधान जाणून भारतीय म्हणून जगले तर देशाला कोणताही धोका नाही.आपण एका धर्मापुरते, जा–तीपुरते मर्यादित राहू नये. आजच्या परिस्थितीत प्रत्येक भारतीयाने जात, पंथ, धर्माचा प्रश्न सोडून प्रथम देशाची भावना आत्मसात केली पाहिजे.भारत देशाम ध्ये राहणाऱ्या प्रत्येक नागरीकाच्या मना मध्ये आणि रक्ताच्या कणाकणामध्ये हम भारतीय है हा एकच आवाज आला पाहीजे.
>
> **– राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज (राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष जय भारत माता सेवा समिती नवी दिल्ली)**

## प्रधानमंत्री यशस्वी योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती मिळणेकरीता १५ ऑक्टोबर पर्यंत अर्ज करावेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : प्रधानमंत्री यशस्वी (झच–धड–डतख) योजनेअंतर्गत इ. १० वी ते इ. १२ वी मध्ये शिकणाऱ्या सोलापूर जिल्हातील इतर म ागास प्रवर्ग, आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवर्ग व विमुक्त जाति भटक्या जमातींच्या विद्यार्थ्यांना टॉप क्लास शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

या योजनेसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपयांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. या योजनेअंतर्ग शिष्यवृत्ती मिळणेकरीता विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज https://scholarships.gov.in/ या नॅशलन स्कॉलरशिप संकेतस्थळावर सादर करावेत.

या संदर्भातील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांनी या कार्यालयाशी व संबंधीत गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती यांच्याशी संपर्क साधून दि. १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत अर्ज भरुन घ्यावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाचे सहायक संचाल गणेश सोनटक्के यांनी केले आहे.

# उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे सार्वजनिक आरोग्य विभाग,व राष्ट्रीय ग्राम ीण आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा रुग्णालय नाशिक व उपजिल्हा रुग्णालय निफाड, जनसेवा हॉस्पिटल निफाड यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व मुलींसाठी आरोग्य तप–ासणी शिबिर आयोजित करण्यात आले. याकरिता नगरपंचायत निफाड चे प्रथम नगराध्यक्ष श्रीमती रत्नमाला कापसे❋ यांच्या हस्ते दीपप्रज्व–लन करून सदर शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. डॉ कपिल आहेर❋ उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक मंडळ नाशिक, डॉ चारुदत्त शिंदे❋ जिल्हाशल्यचिकित्सक नाशिक व डॉ संदीप सूर्यवंशी❋ निव–ासी वैद्यकीय अधिकारी, यांच्या आदेशानुसार तसेच उपजिल्हा रुग्णालय निफाड येथील वैद्यकीय अधिक्षक डॉ राजीव तांभाळे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले



जिल्हा रुग्णालय नाशिक व विविध आरोग्य संस्था म धून आलेल्या स्त्रीरोग तज्ज्ञ, फिजिशियन, कान नाक घसा तज्ञ, नेत्र चिकित्सक अधिकारी, दंतशल्यचिकित्सक, अश्या वैद्यकीय तज्ञांनी ७७५ रुग्णाची तपासणी केली.

एच आय व्ही एड्स, किशोरवयीन मुलींना मासिक पाळी स्वच्छता, हिमोग्लोबिन तपासणी,पोषण आहार,रक्तक्षय व रक्तक्षयास प्रतिबंध, मानसिक आरोग्य विषयक समुपदेशन म ार्गदर्शन करण्यात आले. रुग्णांना जिल्हा रुग्णालय नाशिक, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय नाशिक, वैद्यकीय महाविद्यालय नाशिक,रुग्णालयात शस्त्रक्रिया व संदर्भ सेवेचे समुपदेशन मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हा रुग्णालय नाशिक रक्त पेढी मार्फत रक्तदान शिबिरात १८ रक्तदात्यांचे रक्तसंकलन केले,

या अभियानास प्रमुख पाहुणे म्हणून निफाड नगरपंचायतचे उपनगरध्यक्ष अनिल कुंदे, भाजप शहराध्यक्ष नवनाथ धारराव, तालुका सरचिटणीस गौरव व्यवहारे, कोषाध्यक्ष वैभव कापसे, जिल्हा चिटणीस,संजय गाजरे, सचिन धारराव, संजय वाबळे व उपजिल्हा रुग्णालय निफाड येथील रुग्ण कल्याण समिती सदस्य मधुकर शेलार हे उपस्थित होते तसेच सूत्रसंचालन डॉ सुनीता ढेपले यांनी केले तर आभार प्रदर्शन नितीन परदेशी यांनी केले सदरील कार्यक्रम यशस्वीतेसाठी उपजिल्हा रुग्णालय निफाड येथील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले..

# विश्वकर्मा फाउंडेशनच्या वतीने ‘उद्योजक व्हा’ शिबिराचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : विश्वकर्मा फाउंडेशन व अहिल्यादेवी बहुउद्देशीय सेवा सहकारी संस्था मर्यादित सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजक व्हा शिबिराचे आयोजन दिनांक १२ ऑक्टोबर रोजी करण्यात करण्यात आल्याची माहिती विश्वकर्मा फाउंडेशन संस्थेचे अध्यक्ष संतोष गायकवाड यांनी दिली.

अनेक लोकांना कोणता तरी उद्योग करावयाचा असतो पण कोणता उद्योग करावा याबद्दलची माहिती नसते तसेच आपण उद्य–ोग करू शकतो का याबाबत आत्मविश्वासही नसतो अशा सर्व महिला पुरुष युवक युवतीसाठी ह्या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे सदर शिबिरामध्ये मी उद्योग करू शकतो का ? उद्योग करण्यासाठी कोणते गुण माझ्यात हवेत ते गुण नसेल तर मी ते कसे आत्मसात करावे त्याचबरोबर कोण कोणत्या उद्योग संधी आपल्या शहरात उपलब्ध आ–हेत किंवा कोण कोणते उद्योग आपण करू शकतो जसे शेती व शेतीला पूरक असे कोणते उद्योग आहेत बिगर भांडवली असे बँकेचे डीएसए इन्शुरन्स कंपनीचे एजंट व शेअर मार्केट या विषयातील माहिती दिली जाणार आहे आणि एजन्सी लाईन मध्ये ज्या छोट्या मोठ्या एजन्सी असतात ज्या वस्तू आपल्या रोजच्या जीवनात वापरात असतात अशा वस्तूंची एजन्सी घेण्यासाठी काय लागते किती भांडवल लागते त्याची कार्यपद्धत काय आहे अशा सर्व प्रकारची माहिती या शिबिरात सांगितली जाणार आहे याशिवाय आणखीन कोण कोणते उद्योग तुम्ही करू शकता याचीही माहिती सांगितली जाणार आहे. उद्योगाच्या माहिती बरोबरच बँक लोन कसे मिळते त्यासाठी काय काय कागदपत्रे लागतात शासनाची कोण कोणती महामंडळ आहेत ती कोणत्या समाजासाठी आहेत त्याचा व्याजदर काय आहे त्याची सबसिडी किती आहे मुद्रा लोन स्टार्टअप योजना स्टँडिंग इंडिया विश्वकर्मा योजना अशा अनेक योजनाची माहिती जी व्यवसायासाठी लागणाऱ्या कर्जासाठी लागणार आहे ती या शिबिरात दिली जाणार आहे. जास्तीत जास्त महिला पुरुष युवक युवतीने या शिबिराचा फायदा घ्यावा व अधिक माहितीसाठी १२अ रेल्वे लाईन भैय्या चौक गायकवाड बिल्डिंग सोलापूर ९४२२०६५८५७ / ८०८०९३३२०२ संपर्क करावा असे अह–वान अध्यक्ष संतोष गायकवाड यांनी केले आहे.

# भारतीय बौद्ध महासभेकडून बहुजन हिताय विद्यार्थी वसतिगृहास मदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : उमरगा जिल्हा धाराशिव येथील बहुजन हिताय विद्यार्थी वसतीगृह येथे विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे नियमित आयोजन करण्यात येत असते. शैक्षणिक विकासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या, सांस्कृतिक व क्रीडाविषयक कौशल्य विकासासाठी सुद्धा वसतिगृह कार्यरत आहे. वस्तूगृहाम ध्ये नियमित आठवडी एनसीसी परेड चे आयोजन करण्यात येत असते. हा उपक्रम अधिक चांगला होण्यासाठी व विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळण्यासाठी भारतीय बौद्ध महासभा उमरगा च्या वतीने ढोल बैंड दान देण्यात आला.



धम्मचक्र प्रवर्तन दिन अशोक विजयादशमी च्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात सदर मदत उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार माननीय प्रवीण स्वामी यांच्या हस्ते वस्तीगृहाचे अधीक्षक धम्म चारी प्रज्ञाजीत यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी अनंत कांबळे संजीव कांबळे राजेंद्र सूर्यवंशी विद्याताई कांबळे प्राध्यापक आप्पाराव गायकवाड कैलास शिंदे हरीश डावरे विजय वाघमारे रामभाऊ गायकवाड आदी मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते. यां मदतीची विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांचा विकास करण्यासाठी सहाय्य होईल अशा भावना वस्तीगृह अधीक्षक धम्मचारी प्रज्ञाजीत यांनी व्यक्त केल्या. व याबद्दल भारतीय बौद्ध महासभेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार व्यक्त केले.

# स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल विभागात ‘ॲश्रे’ विद्यार्थी शाखेची स्थापना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर– गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी तथा श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विभागात शनिवार, दि. २० सप्टेंबर २०२५ रोजी ‘ॲश्रे’ तथा ‘अमेरिकन सोसायटी ऑफ हिटिंग रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनींग (ए.एस.एच.आर.एइ.)’ विद्यार्थी शाखेचा स्थापना सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.




संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या सहकार्याने व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली हा सोहळा घेण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करणे, विद्यार्थ्यांचा ॲश्रे उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग वाढवणे व तांत्रिक मार्गदर्शन करणे हे होते. या सोहळ्यास ॲश्रे पुणे चॅप्टरचे स्टुडंट ॲक्टिव्हिटीज को–चेअर प्रा. दीपक भोगे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना विविध उपक्रमात सहभाग घेण्याचे व विद्यार्थी शाखा प्रभावी करण्याचे आवाहन केले. स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगमधील ॲश्रे विद्यार्थी शाखेची स्थापना दि. २६ मार्च २०१९ रोजी झाली होती.

यंदा या शाखेला ६ वर्षे पूर्ण झाली असून सध्या ३५ विद्यार्थी सक्रिय सदस्य म्हणून यात कार्यरत आहेत. विद्या–र्थी प्रतिनिधी मंडळात अध्यक्षा म्हणून नुपूर अचलारे, उपाध्यक्षा म्हणून मानसी कंदी, खजिनदारपदी गौरी महाजन तर सचिव पदाचा भार कुणाल सूर्यवंशी यांनी उचलला आहे.

नवीन निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांनी ॲश्रे शपथ घेऊन एचव्हीएसी ज्ञानाचा प्रसार, स्टेम उपक्रम आणि शाश्वत अभियांत्रिकी तत्त्वांचा प्रचार करण्याबाबतची बांधिलकी व्यक्त केली.

या शपथ कार्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारीची आणि अभिम ानाची भावना दृढ झाली. कार्यक्रमामध्ये एचव्हीएसी अभियंता, गणेश गुंड, एचव्हीए–सी कन्सल्टिंग इंजिनिअर्स आर. एस. कुलकर्णी यांनी महत्वपूर्ण व्याख्यान दिले. त्यांनी एनर्जी–इफिशियंट एचव्हीएसी सिस्टीम्स: पाथवे टू नेट झिरो बिल्डिंग्स’ या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांच्या व्याख्यानात शाश्वत उपाययोजना, उर्जा बचतीची तंत्रे व नेट झिरो इमारतींच्या दिशेने अभियंत्यांची भूमिका अधोरेखित झाली.

संवादात्मक सत्रात विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमाचा समारोप ॲश्रे विद्यार्थी शाखेचे सल्लागार डॉ. दिग्विजय रोंगे, यांनी आभार प्रदर्शन करून केला. त्यांनी ॲश्रे पुणे अध्याय, उपस्थित मान्यवर, प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. हा सोहळा विद्यार्थ्यांच्या प्रेरणेसाठी व शाश्वत अभियांत्रिकीच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला.

# मोहा येथे ६९ वा धम्मचक्र परिवर्तन दिन साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील मोहा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे धम्मचक्र परिवर्तन दिन साजरा करण्यात आला. प्रतिमापूजन ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष अशोक कसबे यांनी केले व ध्वजारोहण माजी उपसरपंच दिलीप जाधव यांनी केले.सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब कसबे यांनी जगाला युद्धाची नाही तर बुद्धाची गरज आहे असे आवर्जून सांगितले. यावेळी कोंडीबा कसबे, अजय कसबे, गणेश कसबे, बन्सी कसबे, युवराज कसबे, महिला व पुरूष मोठया संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# ‘आपली एसटी ॲप’द्वारे एसटीचा ठावठिकाणा कळणार

## आपली एसटी एक मराठमोळे नाव; परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : (२ ऑक्टोबर) प्रत्येक थांब्यावर एसटीची वाट पाहणाऱ्या प्रवाशांना एसटीचा अचुक ठावठीकाणा काळावा, यासाठी आपली एसटी या नावाने नवीन ॲप चे दसऱ्याच्या मुहूर्तावरण लोकार्पण झाले असून भविष्यात प्रवाशांना त्याचा चांगला फायदा होईल! तथापि , १२ हजार पेक्षा जास्त बसेस व राज्यभरातील १ लाख पेक्षा जास्त मार्गाचे मॅपिंग करून हे ॲप विकसित केले आहे. भविष्यात लाखो प्रवासी याचा वापर करणार असल्यामुळे सुरुवातीच्या टप्प्यामध्ये काही तांत्रिक त्रुटी निर्माण झाल्यास, प्रवाशांनी त्या जरूर सुचित कराव्यात, असे आवाहन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे. जेणेकरून एक परिपूर्ण ॲप विकसित करण्यास मदत होईल.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (MSRTC) प्रवाशांच्या सोयीसाठी कम्प्यूटर प नव्या रुपात सादर केलं असून आता या पला ‘आपली एसटी’ (apli ST) असे मराठमोळे नाव परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहे. अर्थात, या पमुळे सर्वसामान्य मराठी प्रवाशांचा प्रवास अधिक सुलभ, सोयीस्कर आणि पारदर्शक होईल यावर अधिक भर दिला जाणार आहे.

‘रोजमाल्टा ऑटोटेक लि.’ या कंपनीच्या सहाय्याने विकसित केलेल्या आपली एसटी (apli ST) पमुळे प्रवासी आपल्या जवळच्या बसस्थानकाची माहिती मिळवू शकणार असून ॲप प्रवासी माहिती केंद्राद्वारे ("Passenger Information System' ) बस कुठून सुटणार (डढऊ) आणि ती बस थांब्यावर केव्हा पोहोचणार (एढ) याची वस्तुस्थिती जन्य (रिअल-टाइम) माहिती मिळेल. त्यामुळे प्रवाशांना थांब्यावर थांबून वेळ घालवण्याची गरज नाही, तर ते थेट बस उपलब्धतेनुसार थांब्यावर पोहोचू शकतील.

> सध्या हे ॲप MSRTC commuter app या नावाने प्ले स्टोअर मधून प्रवाशांना डाऊनलोड करून घेता येईल.तथापि, आपली एसटी (apli ST) हे नाव लवकरच प्ले स्टोअर मध्ये दिसू लागेल.
>
> **– अभिजीत भोसले (जनसंपर्क अधिकारी मा.मंत्री परिवहन)**

ॲपमध्ये अँड्रॉइड आणि पल वापरकर्त्यांसाठी अनेक उपयुक्त सुविधा (फीचर्स )उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. यात प्रवाशांना आपल्या जवळच्या बस थांब्याचा शोध घेणे, दोन थांब्यांदरम्यान चालणाऱ्या बसच्या वेळापत्रकाची माहिती पाहणे, आरक्षण केलेल्या तिकीटातील बस क्रमांक अथवा सेवा क्रमांक टाकून बसची थेट मागोवा (लाईव्ह ट्रॅकिंग करणे) घेणे, यांचा समावेश आहे.

याशिवाय प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पमध्ये आपत्कालीन क्रमांकांची यादी देखील देण्यात आली असून, एकाच क्लिकमध्ये कोणत्याही आपत्कालीन क्रमांकावर कॉल करता येणार आहे.

सध्या या पवर राज्यातील तब्बल १२,००० हून अधिक बसेसचे लाईव्ह डेटा उपलब्ध आहे. भविष्यात सर्व बसेस या पच्या कार्यकक्षेत येतील. पुढे प्रवाशांच्या अभिप्रायाच्या आधारे पमध्ये आणखी सुधारणा करण्यात येणार आहेत. तसेच लवकरच एसटीचे (MSRTC ) सध्या असलेल्या...तिकिट बुकिंग पमध्येही बसची थेट माहिती (Live Data) समाविष्ट केली जाणार आहे, ज्यामुळे आगाऊ तिकीट आरक्षण करणाऱ्या प्रवाशांनाही मोठी सुविधा मिळेल.

एसटीचा उद्देश प्रवाशांना अधिक विश्वासार्ह, पारदर्शक आणि सुरक्षित सेवा देण्याचा असून, आपली एसटी (apli ST) ॲप या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटले आहे. तसेच महामंडळाने याबाबत प्रवाशांकडून सूचना व अभिप्राय मागवुन , त्यांच्या अपेक्षेनुसार पमध्ये सतत सुधारणा कराव्यात अशी सूचना त्यांनी केली आहे.

# शहाजी हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांकडून पुरग्रस्तांना मदतीचा हात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट



संकटाच्या काळात समाजाने एकत्र येऊन एकमेकांना मदत करणे हीच खरी माणुसकी आहे, याचे उत्तम उदाहरण श्री शहाजी हायस्कुल, अक्कलकोट येथील २००३-०४ सालच्या दहावी बॅचच्या विद्यार्थ्यांनी घालून दिले आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोळकवठा, कोर्सेगाव, भिंगे वस्ती हत्तरसंग व नीलम नगर हत्तरसंग येथील पुरग्रस्त भागात त्यांनी मदतीचा हात पुढे केला. या उपक्रमांतर्गत सुमारे १०० नागरिकांना एकवेळचे जेवण देण्यात आले. तसेच, ३० पुरग्रस्त कुटुंबांना किमान दहा ते पंधरा दिवस पुरेल इतक्या अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले.

> **हि आपत्ती केवळ कुणा एकाची नाही तर आपली सर्वांची आहे. प्रत्येकाने आपल्या सामर्थ्यानुसार पुढे येऊन पूरग्रस्त बांधवांना आधार देणे हीच खरी माणुसकी आहे. आमची मदत खऱ्या अर्थाने गरजू नागरिकांपर्यंत पोहोचावी, हाच आमचा एकमेव उद्देश होता. यासाठीच आम्ही खात्रीशीर माहितीच्या आधारे दक्षिण सोलापूर तालुक्यातील नदीकाठची गावे निवडून तेथील पूरग्रस्तांना मदतीचा हात दिला.**
>
> **– सुरज म्हेत्रे (वर्गमित्र)**

पुरामुळे उध्वस्त झालेल्या जनजीवनात ही मदत अनेक कुटुंबांसाठी दिलासा ठरली. समाजाप्रती जबाबदारीची जाणीव ठेवून माजी विद्यार्थ्यांनी दाखवलेली ही एकजूट व सामाजिक बांधिलकी कौतुकास्पद असल्याचे उपस्थितांनी सांगितले. याप्रसंगी सुरज म्हेत्रे, विश्वजीत पाटील, भुषण शहा, सौरभ कुलकर्णी, सचिन कालीबत्ते, अमीत सलबत्ते उपस्थित होते. तसेच अंजली माशाळकर, सुमीत महिंद्रकर, आशिष जाधव, श्रीपाद कुलकर्णी, सागर शिंदे, सागर भडोळे व इतर सर्व माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

# कळंब शहरामध्ये धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त काढली ध्वज रॅली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब: प्रतिनिधी, सुधाकर रणदिवे : ऑक्टोंबर रोजी धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळ्यापासून ते पूर्ण शहरांमधून सुमारे ५०० फूट लांबीच्या पंचरंगी ध्वजासहित हजारो आंबेडकरी अनुयायांच्या उपस्थितीत रॅली काढण्यात आली. या रॅलीला कळंब करानी भरभरून असा प्रतिसाद देऊन पारंपारिक वाद्याच्या गजरामध्ये रथा मध्ये जगाला शांततेचा मार्ग दाखवणारे तथागत भगवान गौतम बुद्ध यांची शांततेच्या मार्गाने मिरवणूक काढण्यात आली.



यावेळेस घोषणा देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो, तथागत गौतम बुद्धांचा विजय असो, जगाला युद्धाची नाहीतर बुद्धांची गरज आहे. अशा घोषणाने कळंबकर मग्न मुग्द्ध झाले. अशा रॅलीने जिल्ह्यातच नाही तर महाराष्ट्रमध्ये एक आगळा वेगळा आदर्श कळंब मध्ये आंबेडकर प्रेमिने दाखवला आहे. शेवटी रॅली डॉ.बाबासाहेब आंबेडकर पूर्ण कृती पुतळ्याजवळ येऊन ठेपली. त्यानंतर सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेऊन निरोप घेतला. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी, माजी नगराध्यक्ष सुनिल गायकवाड, राहुल हौसलमल, सुमित रणदिवे, सतपाल बनसोडे, अनिल हजारे, शिवाजी शिरसट, राजाभाऊ गायकवाड, यांनी परिश्रम घेतले.

या रॅलीला प्रमुख उपस्थिती, माजी आमदार दयानंद गायकवाड, डॉ. संजय कांबळे सर, घाडगे सर, कुणाल मस्के, किशोर वाघमारे, व महिला, पुरुष तथा लहान बालक बालिका मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# इटकुर येथे ६९ वा धम्मचक्र परिवर्तन दिन मोठया उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील इटकुर येथे ६९ वा धम्मचक्र परिवर्तन दिन साजरा करण्यात आला.

जगाला शांततेचा मार्ग देणारे महाकारूणीक तथागत भगवान गौतम बुद्ध व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन पत्रकार सुधाकर रणदिवे यांच्या हस्ते करण्यात आले. व ध्वजारोहण युवराज शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्रिशरण पंचशील समंतबंधू व आत्माराम रणदिवे यांनी घेतले. कार्यक्रमाला, राहुल रणदिवे, मिलिंद रणदिवे, पत्रकार एल.डी शिंदे, वैजिनाथ शिंदे, छत्रभुज रणदिवे, प्रेमकुमार शिंदे, पुरुषोत्तम शिंदे, मुकुंद शिंदे, डी डी शिंदे,

शिवहारी शिरसाट, संजय आरकडे, बाळासाहेब शिंदे, सोहेल लगाडे, बाळराजे सोनवणे, उत्तरेश्वर शिंदे,व इतर समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# गौडगावच्या निसार शेख यांनी ३०० भाविकांची घडविले तुळजापूर दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी




शारदीय नवरात्र उत्सवा निमित्त गौडगांव बु (ता. अक्कलकोट) येथील देवीभक्त ग्रामस्थांना, गावाच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक व शिक्षण क्षेत्रात सक्रिय व भरीव योगदान देणारे उद्योगपती निसार शेख यांच्या स्वखर्चाने

> **नवरात्र उत्सवाच्या काळात गावातील ग्रामस्थांचा एकत्रित तुळजा भवानी देवीचे दर्शन घडवून आणल्याने तसेच देवी भक्तांची सेवा व पुण्य कर्म करण्याचे भाग्य लाभल्याने समाधान मिळत आहे.**
>
> **– उद्योगपती निसार शेख (गौडगाव.बु.)**

४ लक्झरी बस,२ क्लुझर,३ फॉरचनूर या गाड्यांमधून ३०० पुरुष व महिला भाविकांची तुळजापूर दर्शन घडविले.

प्रवासादरम्यान भाविकांसाठी चहा, नाष्टा ,जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती.

तुळजाभवानी देवीचे दर्शनाकरिता लक्ष्मी मंदिर येथे सर्व भाविक उपस्थित राहून मंगळवारी सकाळी ९ वाजता गौडगाव येथून लक्झरी बससह रवाना झाले.

निसार शेख यांच्या उपक्रमाचे गावकऱ्यांसह पंचक्रोशीतील नागरिकांमधून त्यांचे नेतृत्व, समाजहिताची भावना व आपुलकी सदैव प्रेरणादायी आहे असे कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

यावेळी बसण्णा माशाळे, सोमण्णा कुंभार , शंकर पाटील, भीमणा हडपद, सिद्धाराम सुतार, शांतया स्वामी, रवी माशाळकर, रमेश वाघे, सुरेश पुजारी, प्रशांत नरवडे, जकप्पा पुजारी, सिद्धाराम म्हेत्रे( माजी सरपंच), वजीर शेख,लक्ष्मण सलगरे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# अतिवृष्टीग्रस्त व पुरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करावे

## ठाकरे सेना जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी/अमर जाधव

अतिवृष्टीग्रस्त व पुरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे उपसभापती तथा जिल्हाप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे

लातूर जिल्हयासह मराठवाडा तसेच राज्यातील काही जिल्हयात गेले काही दिवस सतत ढगफुटीसदृश्य मुसळधार पाऊस कोसळत असल्याने अतिवृष्टी होऊन नद्या, नाले, ओढयांना महापुर येऊन सर्वच शेतीपिकांचे, फळबागांचे व पशुधनांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांचा हातातोंडाशी आलेला घास नैसर्गिक आपत्तीमुळे हिरावला आहे. तसेच महापुराने नदी, नाले व ओढया काठच्या जमिनी खरडुन जाऊन अतोनात नुकसान होऊन गावची गावे पाण्यात गेल्याने अनेकांचे संसार उघड्यावर पडले आहेत. शेतकरी व सामान्य जनता प्रचंड अडचणीत आले आहेत.

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १० वी) च्या परिक्षा शुल्क भरण्याची अंतिम तारीख ६ ऑक्टोबर असुन उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १२ वी) च्या परिक्षा शुल्क भरण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर आहे. तसेच तरी शासनाने लातूर जिल्हयासह मराठवाडा

तसेच राज्यातील पुरग्रस्त भागातील फेब्रवारी-मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या इयत्ता १० वी माध्यमिक शालांत परिक्षांचे आणि इयत्ता १२ वी उच्च माध्यमिक शालांत परिक्षांचे शुल्क माफ करून नैसर्गिक आपत्तीमुळे संकटात सापडलेल्या पालकांना व विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे उपसभापती तथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे

**प्रत्येक निवारा केंद्राच्या ठिकाणी आरोग्य पथक नियुक्त**

**८२ गावांमध्ये १२० तात्परते निवारा केंद्रांची निर्मिती**

# सोलापूर जिल्ह्यात पूरग्रस्त भागात आरोग्य विभागाची तत्परता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





सोलापूर : अतिवृष्टी व पुरामुळे जिल्ह्याच्या करमाळा, माढा, मोहोळ, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर व अक्कलकोट या तालुक्यातील गावे मोठ्या प्रमाणावर बाधित झालेली आहेत. तसेच जिल्ह्यात ८२ गावांमध्ये १२० तात्परते निवारा केंद्र निर्माण केलेली आहेत. या सर्व निवारा केंद्रात आरोग्य विभागाचे सामुदायिक आरोग्य अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली पाच आरोग्य कर्मचाऱ्यांचे पथक नागरिकांच्या आरोग्य तपासणीसाठी कार्यरत आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील पूरग्रस्त भागात जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाच्या वतीने निवारा केंद्रांची पाहणी व आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. उपकेंद्र हत्तुर येथील श्री सोमेश्वर मंदिरातील निवारा केंद्रास जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी भेट देऊन पूरग्रस्त भागात आरोग्य विभागाच्या वतीने देण्यात येत असलेल्या आरोग्य सुविधांची पाहणी केली.

प्राथमिक आरोग्य केंद्र होटगी अंतर्गत मद्रे उपकेंद्रातील सिंदखेड गावस पूरपरिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांना मद्रे आनंद नगर तांडा, आहेरवाडी कोणापुरे शाळा, बांकळगी जिल्हा परिषद शाळा येथे निवारा केंद्रात सुरक्षित ठेवण्यात आले. या ठिकाणी राहण्याची, भोजनाची व औषधोपचाराची सोय करण्यात आली असून . डॉ. संतोष नवले, डॉ. नीलिम घोगरे (तालुका आरोग्य अधिकारी) व त्यांची टीम यांनी प्रत्यक्ष भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला व अडचणी जाणून घेतल्या. तसेच सर्व नागरिकांचे आरोग्याची तपासणी करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार अक्कलकोट तालुक्यात संगोगी ब, मैदर्गी, शेगाव व करजगी प्रा.आ. केंद्रांतर्गत पूरग्रस्त भागात आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अश्विन करजखेडे यांनी शिबिरास भेट दिली. वैद्यकीय अधिकारी, आरोग्य टीम, ग्रामसेवक व सरपंच उपस्थित होते. करमाळा तालुक्यात जातेगाव, खडकी व कामोने उपकेंद्रांमध्ये विजयसिंह मोहिते पाटील नर्सिंग कॉलेज, अकलूज येथील विद्यार्थ्यांच्या सहभागातून आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. तसेच कंदलगाव प्रा.आ. केंद्रांतर्गत गुंजेगाव येथील आपत्तीग्रस्त निवारण केंद्रास भेट देऊन लाभार्थ्यांची विचारपूस करण्यात आली. जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाच्या समन्वयातून पूरग्रस्त नागरिकांसाठी निवारा, आरोग्य सेवा व आवश्यक सुविधा तत्परतेने उपलब्ध करून दिल्या जात असून, पूरग्रस्त बाधित गावामध्ये कोणत्याही प्रकारचे साथीचे आजार पसरणार नाहीत या अनुषंगाने आरोग्य विभाग दक्षता घेत आहे.

# राज्यातल्या बळीराजाच्या पाठीमागे आम्ही भक्कमपणे उभे

## उपमुख्यमंत्री अजितदादा पवार; दिवाळी पर्यंत शेतकऱ्यांना आम्ही शक्य ती आर्थिक मदत करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुरबाड (ठाणे) : प्रफुल्ल शेवाळे / विजय घनघाव

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. ना. श्री. अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत विजयादशमीच्या मंगलदिनी ठाणे जिल्ह्यातील मुरबाड येथे पक्षाच्या नूतन जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटनासह कार्यकर्ता मेळावा पार पडला. ठाणे जिल्हा ग्रामीण युवक जिल्हा अध्यक्ष प्रतिक हिंदुराव यांच्या संकल्पने मधून राष्ट्रवादी काँग्रेस चे मध्यवर्ती कार्यालय आज मुरबाड येथे उदयाला आले आहे.

यावेळी आपल्या उदघाटन पर आणि मार्गदर्शन भाषणात अजितदादा यांनी म्हटलं की शेतकरी हा लाखाचा पोशिंदा आहे आणि ह्या शेतकऱ्यांवर आज जे काही संकट आहे, त्या संकटातून बाहेर काढण्यासाठी आम्ही सर्वतोपरीप्रयत्न करणार आहोत. राज्यतल्या बळी राजाच्या पाठीमागे आम्ही ठामपणे उभे आहोत, येत्या दिवाळी पर्यंत शेतकऱ्यांना आम्ही शक्य ती आर्थिक मदत त्यांच्या बँक खात्यामध्ये वर्ग करणार आहोत.

यावेळी मा. अजितदादांनी मेळाव्याच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटनात्मक शक्ती अधिक बळकट करण्याबाबत राष्ट्रवादी परिवाराला मार्गदर्शन केले.

याप्रसंगी संबोधित करताना, विजयादशमीच्या मंगलप्रसंगी सुरू होत असलेल्या ह्या नवीन कार्यालयाच्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पक्षकार्याला नवी दिशा मिळणार असून, राष्ट्रवादी विचारांना बळकटी प्राप्त होणार आहे. राष्ट्रवादी परिवाराचा प्रमुख म्हणून कार्यरत असताना, शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांनी व स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांच्या सुसंस्कृत बेरजेच्या राजकारणाचा आदर्श मानत, सर्व जाती-पाती धर्म पंथाच्या लोकांना सोबत घेऊन वाटचाल करावी, याला मी प्राधान्य देत आहे, असे विचार मा. अजितदादांनी व्यक्त केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची शिव-शाहू-फुले-आंबेडकरांची विचारधारा, लोककल्याणकारी ध्येय आणि जनतेच्या सेवेसाठी सातत्यानं कसं कार्य करायचं, याविषयी भावना



अजितदादा यांनी व्यक्त केल्या. या मेळाव्याच्या माध्यमातून पक्षाची संघटनात्मक शक्ती अधिक दृढ होईल आणि कार्यकर्त्यांना विकासाभिमुख, लोकाभिमुख कार्य करण्याची नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास अजितदादा यांच्याकडून व्यक्त करण्यात आला आहे.

यावेळी कल्याण - नगर प्रलंबित रेल्वे मार्गाबाबत आपण दिल्ली दरबारीं या विषयावर आपला पाठपुरावा करणार आहोत असं अजितदादा यांनी स्पष्ट केले आहे.

एकजुटीनं कामं केल्यास प्रत्येक कार्यकर्ता हा पक्षाचा कणा ठरतो आणि त्यातूनच समाजासाठी सकारात्मक बदल घडवता येतात, असं मत यावेळी अजितदादा यांनी व्यक्त केलं.

यावेळी प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव, मुख्य प्रवक्ते आणि प्रदेश सरचिटणीस मा. खासदार श्री. आनंद परांजपे, नजीब मुल्ला, शहापूर विधानसभा आमदार दौलत दरोडा,ठाणे जिल्हा अध्यक्ष भरत गोंधळे, युवक अध्यक्ष प्रतीक हिंदुराव प्रदेश सरचिटणीस किसनराव तारमळे, संजय तिवरे, डी. के. विशे सर, प्रदेश सचिव रवींद्र परटोले, महिला जिल्हध्यक्ष सौ. कल्पना तारमळे, जिल्हा उपाध्यक्ष अरुण जाधव, प्रशांत हेगडे, प्रविण देशमुख, मुरबाड तालुका अध्यक्ष चंद्रकांत बोस्टे, शहापूर तालुका अध्यक्ष डॉ. मनोहर सासे, कल्याण अध्यक्ष बाळाराम कोर, यांच्यासह ठाणे जिल्ह्यातील महिला-भगिनी,पक्षाचे विविध फ्रंटल सेल चे जिल्हा अध्यक्ष,तालूका अध्यक्ष स्थानिक नागरिक व पक्षाचे विविध स्तरावरील पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

# हिंदु जनजागृती समितीच्यावतीने पालकमंत्री आणि विद्यमान आमदारांना निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर : राज्यभरात असंख्य हिंदु युवती आणि महिला 'लव्ह जिहाद'च्या षडयंत्राला बळी पडलेल्या आहेत. हे षडयंत्र रोखण्यासाठी येत्या हिवाळी अधिवेशनात कठोर 'लव्ह जिहाद'विरोधी कायदा संमत करावा, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीच्या वतीने सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. या वेळी पालकमंत्र्यांनी हिवाळी अधिवेशनात 'लव्ह जिहाद' विरोधी कायदा होण्यासाठी प्रयत्न करीन', असे आश्वासन दिले.

**हिवाळी अधिवेशनात 'लव्ह जिहाद' विरोधी कायदा होण्यासाठी प्रयत्न करणार : पालकमंत्री जयकुमार गोरे**

याच मागणीचे निवेदन भाजपचे आमदार महेश कोठे, विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख यांनाही देण्यात आले. या वेळी हिंदु जनजागृती समितीच्या कु. वर्षा जवळे, श्री. विनोद रसाळ, सनातन संस्थेच्या सौ. विद्या कुलकर्णी, सौ. सुवर्णा गोस्की, सौ. सुनीता न्यामणे आदी उपस्थित होते. याठिकाणी उपस्थित युवती आणि महिला यांनी हातात वैशिष्ट्यपूर्ण फलक धरले होते. या फलकांवर 'भाऊबीजेची ही भेट द्या ना, लव्ह जिहाद विरोधी कायदा करा ना !', 'आमची सुरक्षा तुमच्या हाती, राज्याला गरज लव्ह जिहाद विरोधी कायद्याची !' अशा घोषणा लिहिल्या होत्या, तसचे 'मैं हू दुर्गा, शक्ति का प्रतीक' या अभियानचे फलक ही हातात धरण्यात आले होते, या फलकांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

# विजयादशमी दसरानिमित्त श्री विठ्ठलास अलंकार, रूक्मिणी मातेस पारंपारिक श्री.विजयालक्ष्मी पोशाख सह अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात सुरु झालेली आहे, यानिमित्त दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे खंडेमहानवमी विजयादशमी दसरा दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये रूक्मिणी मातेस श्री.विजयालक्ष्मी पोशाख परिधान करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.

श्री विठ्ठलास सोन्याची पगडी, नाम निळाचा, कौस्तुभ मणी, दंड पेठया जोड, कंगन जोड, हिऱ्याचा मोत्याचा तुरा, शिरपेच लहान, मोत्याची कंटी दोन पदरी, मोठ्याची कंठी एक पदरी, बाजीराव कंठा, पुतळ्यांची माळ, मोहरांची माळ, तुळशीची माळ एक पदरी मोठी, बोरमाळ तीन पदरी, हिऱ्यांचे पैंजण, नवरत्नांचा हार, सोन्याचे घोंगडे, चांदीची कंठी, सोन्याचे पितांबर, सोन्याचे



तोडे जोड, लॉकेट इ. अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच *रुक्मिणी मातेस जडावाचा मुकुट, तन्मणी मोठा, खड्यांच्या पाटल्या जोड, मोठी नथ, कर्णफुले जोड, सूर्य, चंद्र, जडावाचे तारवाड जोड, चिंचपेटी हिरवी, हातसर जोड, खड्यांची वेणी, जडावाचा हार, तन्मणी लहान, मोत्याचा कंठा लहान, पाचूची गरसोळी, बाजीराव गरसोळी, खड्याची बिंदी, जाडावाचे बाजूबंद जोड, रूळ जोड, पैंजण जोड, सोन्याचा करंडा, मस्त्य जोड, तारामंडळ, तोडे जोड, सोनाचे बाजूबंद जोड, दशावतारी हार, मद्रासी कंठा, शिन्देहार ३ पदरी, मास पट्टा, सोने साडी, छत्रछामार इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच राधिका मातेस नक्षी टोप, मोत्याचा कंठा मोठा, हायकोल, चिंचपेटी तांबडी, ठुशी व *सत्यभामादेवीला सिद्धेस्वर टोप, लक्ष्मीहार मोहरांची माल, जवमनी पदक, इत्यादी अलंकार व प्रथा परंपरेप्रमाणे पोशाख परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच मंदिर समितीच्या अख्त्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात आल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

# सोलापूर जिल्ह्यातील नदिला आलेल्या पुराने व अतिवृष्टीने नुकसान झालेलेल्यांना ठोस मदतीची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या पंढरपूर संघाची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/ संतोष मोरे : सोलापूर जिह्यातील नद्यांना महापूर येवून व अतिवृष्टी होऊन शेतीपिके, घरे व जनावरे यांचे मोठ्या प्रमाणात लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यांना शासनाने ताबडतोब ठोस मदत द्यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई च्या पंढरपूर येथील संघाच्या पदाधिकारी व सभासदांनी पंढरपूर तहसीलदारांना निवेदन देऊन केली आहे.

मोठ्या प्रमाणात पुराने व अतिवृष्टीने शेतातील पिकां बरोबरच शेत जमीन सुद्धा वाहून गेली आहे. तसेच घरांची पडझड होऊन घरातील अनधान्य, भांडी, कपड़े, मौल्यवान वस्तू सह जनावरे व शालेय विद्यार्थ्यांचे वह्या, पुस्तके, शैक्षणिक साहित्य देखील वाहून गेले आहे.तरि शासनाने त्वरित ठोस मदत करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने केली आहे.

यावेळी म. रा.पत्रकार संघाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष राजेंद्र कोरके- पाटील, पंढरपूर शहर अध्यक्ष संतोष मोरे, ता. अध्यक्ष रवि कोळि, सचिव कुमार कोरे, प्रमोद भोसले, सुनिल अधटराव, संजय यादव व पत्रकार साळुंखे सह इतर पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भूमापक उपाधीक्षक भूमि अभिलेख सि. राजा कार्यालयातील कर्मचारी प्रकाश चंद्रकांत शिंदे यांना डॉ . एपीजे अब्दुल कलाम उत्कृष्ट कर्मचारी राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा प्रतिनिधी : सिंदखेडराजा भूमी अभिलेख कार्यालयातील भूमापक उपाधीक्षक म्हणून कार्यरत असलेले प्रकाश चंद्रकांत शिंदे यांनी भूमापक पदावर काम करत असताना दोन वर्षातील केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना तथागत सामाजिक संस्था तसेच सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त व स्व . मधुकरराव खंडारे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यामध्ये त्यांना भारतरत्न डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम उत्कृष्ट कर्मचारी राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. तशा निवडीचे पत्र त्यांना कार्यक्रमाचे मुख्य आयोजक पत्रकार सचिन खंडारे,पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष विकास सुखधाने यांनी



दिली आहे.

तालुक्यातील अनेक नागरिकांना भूमी अभिलेख कार्यालय म्हणजे नेमकं काय असतं हे माहीत नव्हते प्रकाश शिंदे हे लातूर वरून आल्यानंतर त्यांनी खऱ्या अर्थाने लोकांमध्ये खेळीमेळीच्या वातावरणामध्ये भूमी अभिलेख कार्यालयाची व्याख्या समजावून सांगितली, त्याचबरोबर लोकसभा विधानसभा निवडणुकीमध्ये सुद्धा त्यांनी उपविभागीय अधिकारी त्याचबरोबर तहसीलदार यांच्या समवेत खांद्याला खांदा लावून अतिशय प्रामाणिकपणे कर्तव्य पार पाडले, वर्तमानपत्रांमध्ये येणाऱ्या निवडणुकीच्या बातम्या चा संच त्यांनी बनवला याचे कौतुक स्वतः बुलढाणा जिल्हाधिकारी पाटील यांनी केले होते, प्रत्येक शेतकऱ्याशी ते सौजन्याने वागतात, प्रत्येक शेतकऱ्याचे समाधान त्यांना समजावून सांगून ते करत असतात, आणि याच कार्याची दखल घेत त्यांना भारतरत्न डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार जाहीर करण्यात आला, सदर पुरस्कार सोहळा नोव्हेंबर मध्ये आयोजित करण्यात आला असून अनेक दिग्गज मान्यवरांचे हस्ते हा पुरस्कार सोहळा त्यांना प्रदान करण्यात येणार आहे, पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सर्वच स्तरामधून प्रकाश शिंदे यांच्यावर अभिनंदन याचा वर्षाव होत आहे . तर आपल्याला जो पुरस्कार मिळाला तो पुरस्कार खऱ्या अर्थाने दोन वर्षांमध्ये लोकांशी सौजन्यपणाने वागलो प्रामाणिकपणाने काम केले याचीच पावती असल्याचे मत यावेळी शिंदे यांनी व्यक्त केले.

**कोण आहेत प्रकाश शिंदे**

प्रकाश चंद्रकांत शिंदे हे व्यक्ती मूळचे लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील खानापूर या गावचे आहे ' मध्यमवर्गीय कुटुंबातील हा मुलगा शिक्षण झाल्यानंतर पुणे येथील चाकण राजगुरुनगर येथे स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी जवळपास दहा वर्षे वास्तव्यात होता, शिंदे यांचा भूतकाळ खूप संघर्षमय राहिला.

त्यांच्या आयुष्यात खूप चढउतार पाहायला मिळाल्यानंतर जवळपास पंधराहून अधिक निकाल ०.७५ ते ५ मार्कच्या आत गेले , पुढे एमपीएससीचे अभ्यास करण्यासाठी गेलेला हा मुलगा खूप संघर्ष करून खूप अपयश पासून हार न मानता शेवटी महाराष्ट्र शासन सेवेत प्रवेश घेऊनच थांबला ' खूप मेहनती कष्टाळू जिद्दी असे हे व्यक्तिमत्व मागील दोन वर्षापासून आपण सिंदखेडराजा तालुक्यामध्ये त्यांच्या कामातून पाहत आहेत, प्रकाश शिंदे आणि लोकसभा विधानसभा निवडणुकीमध्ये आपल्या कामाची चुणूक दाखवली वरिष्ठांनी त्यांचे भरभरून कौतुक केले, उपविभागीय अधिकारी संजय खडसे साहेबांनी त्यांच्यावर विश्वास टाकून महत्त्वाची प्रसार माध्यम विभागाची जबाबदारी दिली आणि त्यांनी ती अतिशय लिलया पणे पेलली.

## कर्मचाऱ्यांना एक महिन्याचा पगार बोनस म्हणून भेट

## चौथा बॉयलर अग्रीप्रदीपन उत्साहात संपन्न

# आवताडे शुगरचे ऊस उत्पादकांच्या सहकार्यामुळे तीन हंगाम यशस्वी : आ.आवताडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवेढा/प्रतिनिधी :- शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतलेला अवताडे शुगर प्रायव्हेट लिमिटेड साखर कारखाना हा शेतकऱ्यांनी सहकार्य करून आमच्यावर विश्वास दाखवत ऊस कारखान्याला घातल्यामुळे तीन हंगाम यशस्वी पार पडले असून यामध्ये कामगारांचा वाहतूकदारांचा सिंहाचा वाटा आहे हंगाम यशस्वी करण्यासाठी अहोरात्र झटलेल्या कारखाना कर्मचाऱ्यांना दिवाळीसाठी एक महिन्याचा पगार बोनस म्हणून देणार असून यापुढेही शेतकऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी असेच सहकार्य करावे शेतकऱ्यांचे समाधान होईल असा दरही देण्याचा आमचा प्रयत्न असेल,वाढीव ऊस उताऱ्यासाठी शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघांचे आमदार समाधान आवताडे यांनी व्यक्त केले आहे. आवताडे शुगर अँड डिस्टिलरीज प्रा.लि. नंदूर या साखर कारखान्याचा चौथा बॉयलर अग्नीप्रदीपन समारंभ आमदार आवताडे यांच्या हस्ते व कारखान्याचे चेअरमन संजय आवताडे यांच्या उपस्थितीमध्ये उत्साहात संपन्न झाला.

यापुढील काळात सुद्धा आपल्या सर्वांच्या साथीने आवताडे शुगर आपली उत्कृष्ट वाटचाल कायम ठेवील असेही आमदार अवताडे यांनी सांगितले यावेळी शेतकरी अनिल यादव, कारखान्याचे सरव्यवस्थापक सुधीर पाटील, संचालक औदुंबर वाडदेकर, माजी उपसभापती विजयसिंह देशमुख यांनीही आपली मनोगते मांडली. यावेळी कारखाना कार्यस्थळावर हंगाम २०२५-२६ बॉयलर प्रदिपन समारंभासाठी मागील तीन वर्षात जास्त ऊस घातलेले शेतकरी शितल सागर खबाले,अमृता विठ्ठल पवार, कमल दत्तात्रय गायकवाड, तेजश्री सुनिल शेणवे, संगीता शंभु माळी,अर्चना सारंग जाधव, पिंकाबाई दादा जानकर, कुसुम निवृत्ती चव्हाण, कल्पना निवृत्ती बंडगर, संगीता प्रकाश कोरे, सारिका तानाजी भोसले या ११ शेतकऱ्यांच्या हस्ते जोडीने सत्यनारायण व होमहवन पूजा करण्यात आली.

यावेळी श्री संत दामाजी मंदिर समितीचे अध्यक्ष विष्णुपंत आवताडे, यशोदा महिला पतसंस्थेच्या चेअरमन निला आटकळे, मार्केट कमिटी माजी सभापती सोमनाथ आवताडे, माजी जि.प सदस्य बापुराया चौगुले, माजी सभापती प्रदीप खांडेकर, सुधाकर मासाळ, माजी उपनगर अध्यक्ष चंद्रकांत पडवळे, माजी प.स.सदस्य नितीन पाटील, दामाजीचे संचालक गौडाप्पा बिराजदार, दामाजी कारखान्याचे माजी व्हा.चेअरमन अंबादास कुलकर्णी, माजी संचालक सुरेश भाकरे, रमेश भांजे, राजीव बाबर, विजय माने, राजन पाटील, बापूराव काकेकर, संजय पवार, भारत निकम, बसवेश्वर




पाटील, शिवयोग्याप्पा पुजारी, विठ्ठलचे माजी संचालक दुर्योधन हाक्के, मारापुरचे सरपंच विनायक यादव, धनंजय पाटील, जनार्धन शिवशरण, तुकाराम कुरे, प्रशांत जगताप, अॅड. डीसी जाधव, कैलास चळेकर, गणेश गावकरे, गंगाधर काकनगी, धनाजी बिचुकले, आकाश डांगे, आवताडे स्पिनर्सचे युनिट हेड सुनील कमते, वर्क्स मॅनेजर धैर्यशील जाधव, चिफ केमिस्ट सुनील पाटील, डिस्टीलरी मॅनेजर संभाजी फाळके, चिफ अकौटट बजरंग जाधव, शेती अधिकारी राहुल नागणे, उपशेती अधिकारी तोहीद शेख, ऊस पुरवठा अधिकारी दामोदर रेवे, एचआर मॅनेजर डी बी बळवंतराव, इडीपी मॅनेजर निलेश रणदिवे, असि सुरक्षा अधिकारी रणजीत पवार तसेच सर्व अधिकारी आणि पदाधिकारी, खातेप्रमुख आणि शेतकरी तसेच कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.